**जनसंपर्क अधिकारी, पोलीस आयुक्तालय,**
**ठाणे शहर**

इमेल-cp.thane.pro@mahapolice.gov.in

**मो.क्र.9819208279**

**प्रेसनोट** **दिनांक ३१.०१.२०२५**

# “ भिवंडी परिसरात गांजा हा अंमली पदार्थ विक्री करीता आणणाऱ्या आरोपीस अटक ”

दिनांक २५/०१/२०२५ रोजी खंडणी विरोधी पथकास मिळालेल्या माहिती वरुन त्यांच्या पोलीस पथकाने एकता चौक, क्रांतीनगर, निजामपूरा, भिवंडी येथे सापळा रचुन तेथील एक इसम नामे रहीम करीम शेख, वय ३४ वर्षे, रा.क्रांतीनगर, निजामपूरा, भिवंडी यास ताब्यात घेवुन त्याची झडती असता त्याच्या ताब्यातील प्लॅस्टिकच्या पिशवीमध्ये २० किलो ४०० ग्रॅम वजनाचा २,००,०००/- रूपये किंमतीचा गांजा हा अंमली पदार्थ मिळून आला. सदर आरोपी विरूध्द शांतीनगर पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. I ११८/२०२५ एन.डी.पी.एस.कायदा कलम ८(क), २०(ब), II (क), २९ प्रमाणे दिनांक २६/०१/२०२५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला असुन आरोपीस अटक करण्यात आली आहे. आरोपीविरूध्द यापूर्वीही भोईवाडा पोलीस ठाणे भिवंडी येथे अंमली पदार्थ संदर्भात गुन्हा दाखल आहे.

सदरची कारवाई श्री.अमरसिंह जाधव, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), ठाणे, श्री.राजकुमार डोंगरे, सहायक पोलीस आयुक्त, शोध -२, गुन्हे शाखा, ठाणे, श्री.शेखर बागडे, सहाय्यक पोलीस आयुक्त, शोध-१, तथा प्रभारी अधिकारी, खंडणी विरोधी पथक, गुन्हे शाखा, ठाणे शहर यांच्या मार्गदर्शनाखाली पोनि/नरेश पवार व त्यांच्या पथकाने केलेली आहे.

( शैलेश साळवी )
वरिष्ठ पोलीस निरीक्षक तथा जनसंपर्क
अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर